**MHKO100006502022**

नियमीत दिवाणी दावा क्र. १६९/२०२२ निशाणी २२६ वर आदेश

वादीने सदर अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, कलम १५१ नुसार दाखल केला आहे. त्यांचे असे कथन आहे की, मा. उच्च न्यायालय, मुंबई, सर्कीट बेंच, कोल्हापूर यांनी रिट पिटीशन क्र.११७४१/२०२५ मध्ये दिनांक २८/११/२०२५ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार वादी यांना सदर कामी दुय्यम पुरावा करण्याची व दिनांक ११/०२/१९८८ च्या हमीपत्राचा शोध घेण्याचे स्वातंत्र दिले आहे. तरी वादी यांना फेर पुरावा करण्यास परवानगी देण्यात यावी.

२. सदर अर्जास प्रतिवादी यांनी निशाणी २२९ वर त्यांचे म्हणणे दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, मा. उच्च न्यायालय मुंबई, सर्कीट बेंच, कोल्हापूर यांच्या वरील न्यायनिर्णयानुसार वादी यांना दुय्यम पुरावा अथवा कागद शोध घेण्याकरीता मुभा दिलेली नाही. या आदेशानुसार as per law मुभा दिली आहे. मा. उच्च न्यायालय यांनी मुभा दिली याचा अर्थ वादी यांचा प्रस्तुत अर्ज मंजूर करावा असा अर्थबोध काढता येणार नाही. कायदयाने अभिप्रेत तरतुंदीचे पालन करून वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल करणे आवश्यक होते. तथापि वादी यांच्याकडून अदयापही असे होताना दिसत नाही. वादी यांनी यापुर्वी पुरावा का केला नाही याचे कारण या अर्जात नमूद करणे आवश्यक होते, परंतु तसे कारण नमूद केले नसल्याने सदर अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशामधील निरीक्षणाचा हवाला देताना निव्वळ औपचारिक अर्जाद्वारे कोणतेही सबळ कारण नमूद न करता वादींनी दाखल केलेला अर्ज कायदयाप्रमाणे चालण्यास पात्र नाही. वादी यांना पुरेशी संधी देवूनही त्यांचा पुरावा संपल्याबाबत पुरसीस त्यांनी दाखल केली आहे. त्यामुळे सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा.

३. दोन्ही विधीज्ञ यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. दोन्ही विधीज्ञांनी त्यांच्या वर नमूद अर्जातील व म्हणणेतील मजकूराप्रमाणे युक्तीवाद केला.

४. मा. उच्च न्यायालय मुंबई सर्कीट बेंच, कोल्हापूर यांच्या वर नमूद आदेशाचे मी बारकाईने वाचन केले. त्या आदेशानुसार निशाणी १०० वरील व निशाणी २०४ वरील आदेश रद्द करण्यात आले आहेत. तसेच वादी यांना दुय्यम पुरावा करण्यास व कागदाचा शोध घेण्याचे स्वातंत्र्य देण्यात आले आहे.

५ वादी यांनी त्यांचा पुरावा संपल्याबाबत पुरसीस अभिलेखावर दाखल केली आहे. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाच्या वरील आदेशाचा निर्वाळा देत वादीने सदर अर्ज फेर पुरावा करण्यास परवानगी मागण्याकरीता दाखल केला आहे. निशाणी १०० व २०४ वरील आदेश रद्द झाल्याने प्रतिवादी यांनी दिनांक ११/०२/१९८८ रोजीचे हमीपत्र दाखल करण्याचा केलेला आदेश रद्द झाला आहे. त्यामुळे प्रतिवादीविरूध्द कोणतेही प्रतिकुल अनुमान काढता येणार नाही.

६. मा. उच्च न्यायालयाने नमूद केल्याप्रमाणे वादीला फेर पुरावा करण्याची संधी देणे गरजेचे आहे. वादीने निशाणी १०० वरील अर्ज व पुरावा बंद करण्याची पुरसीस एकाच दिवशी दाखल केली होती. वादीने निशाणी १०० वर काय आदेश होतो याची वाट न पाहता पुरावा बंद पुरसीस दाखल केली होती. त्यानंतर प्रतिवादी यांनी त्यांचा पुरावा दाखल केला व वादीतर्फे त्यांचा उलटतपासात घेण्यात आला. प्रतिवादीने पुरावा बंद केल्यानंतर दावा अंतिम युक्तीवादाकरीता ठेवण्यात आला होता. त्यानंतर मा. उच्च न्यायालयाचे वरील आदेशानुसार वादीने हा अर्ज दाखल केला आहे.

७. दावा अंतिमरित्या गुणदोषावर निकाली काढण्यासाठी वादी यांना फेर पुरावा करण्याची संधी देणे न्यायाचे होणार आहे. परंतु वादीने पुरावा बंद पुरसीस व निशाणी १०० वरील अर्ज एकाच दिवशी दाखल केले यावरून वादीला पुढे कोणताही पुरावा देण्याचा नव्हता असे दिसून येते. आता केवळ मा. उच्च

न्यायालयाचे आदेशानुसार वादीने सदर अर्ज दाखल केला आहे. म्हणून न्यायाचे कारणास्तव सदर अर्ज खर्चाची रक्कम बसवून मंजूर करणे योग्य होणार आहे. त्यानुसार मी खालील आदेश पारीत करत आहे.

आदेश

१ प्रतिवादीस रक्कम रूपये २०००/- खर्चास्तव देण्याच्या अटीवर वादीस फेर पुरावा करण्यास परवानगी देण्यात येते.

२ वादीने खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत किंवा त्या अगोदर प्रतिवादीस दयावी नाहीतर वादीस फेर पुरावा करण्यास परवानगी नामंजूर करण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2026.01.02 15:06:07 +0530

दिनांक ०१.०१.२०२६
गडहिंग्लज

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
गडहिंग्लज